O/C

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# MIRA-BHAINDAR MUNICIPAL CORPORATION

जा.क्र.: मनपा/पे ॲन्ड पार्क/८७/२०१६-१७ दिनांक : २७/२/१७

विषय : भाईंदर(प.) रेल्वे स्टेशन जवळ स्कायवॉक खाली पे ॲन्ड पार्क (वाहनतळ) ठेका पद्धतीने चालविणे बाबत.

संदर्भ : १) जाहिरात विभाग यांचे कडील नोटीस जा.क्र.मनपा/जाहिरात/८५/२०१५-१६, दि. २२/०७/२०१५.

२) या कार्यालयाकडील अंतीम नोटीस जा.क्र.मनपा/पे ॲन्ड पार्क/७०/२०१६-१७, दि. १३/१२/२०१६.

३) मे. सुशिला ट्रेडींग कॉर्पोरेशन यांचा दि. १९/१२/२०१६ रोजीचा खुलासा. (प्राप्त दि. २१/१२/२०१६)

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दित भाईंदर(प.) रेल्वे स्टेशन जवळ स्कायवॉक खाली पे ॲन्ड पार्क (वाहनतळ) येथे सार्वजनिक बांधकाम विभागाने एकूण २२० दुचाकी वाहनांची क्षमता असल्याचे जा.क्र. मनपा/सा.बां./२८३९/२०१०-११ दि. ०२/०८/२०१० च्या पत्राने कळविले होते त्या अनूषंगाने निविदा मागविण्यात आल्या होत्या सदर निविदेत मे. सुशिला ट्रेडिंग कॉर्पोरेशन यांची निविदा स्विकारण्यात येऊन तीला मा. महासभा दि. २०/०२/२०१३ ठराव क्र. ५७ अन्वये मंजुरी दिली होती. परंतू यशस्वी ठेकेदार यांनी असमर्थता दर्शविल्यामुळे त्यांचे डिपॉझिट जप्त करुन त्यांना काळ्या यादित टाकण्याबाबत तत्कालिन मा. आयुक्त यांनी मंजूरी दिलेली होती त्यानुसार यशस्वी निविदाकार मे. सुशिला ट्रेडिंग कॉर्पोरेशन यांनी निविदेत भरणा केलेली इसारा रक्कम रु. ५२०० जप्त करण्यात आलेली आहे. तसेच संदर्भ क्र. १ अन्वये काळया यादित टाकण्याची कार्यवाही का करण्यात येऊ नये याबाबत खुलासा मागविण्यात आला होता परंतू संबंधित एजन्सीकडून कोणताही खुलासा प्राप्त न झाल्याने त्यांना संदर्भ क्र. २ अन्वये अंतिम नोटीस बजावण्यात आलेली होती. त्यानूसार संदर्भ क्र. ३ अन्वये खुलासा प्राप्त झालेला आहे. सदर खुलाशात अनधिकृतरीत्या होणारे पार्किग हटविण्याबाबत यापुर्वी कळविले होते. परंतू अनधिकृत पार्किंग न हटविल्यामुळे काम करण्यास असमर्थता दर्शविल्याचे नमुद केले आहे.

परंतू निविदा प्रक्रिया सुरु करते वेळी निविदा पुस्तिकेत दिलेल्या सुचनेनूसार निविदाकाराने नियोजीत वाहनतळाच्या जागेचे व आजुबाजूच्या परिसराची पाहणी करुन संभाव्य वाहने वाहनतळावर पार्किंगबाबतच्या अंदाजाचे अवलोकन करुन निविदा सादर केली आहे, असे मानण्यात येते. निविदा मंजूर झाल्यानंतर कोणतीही तक्रार विचारात घेतली जात नाही.

मुख्य कार्यालय : स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे -४०१ १०१.
दूरध्वनी : २८१९२८२८ / २८१९३०२८ / २८१८११८३ / २८१८१३५३ / २८१४५९८५ फॅक्स : २८१९७६३६

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## MIRA-BHAINDAR MUNICIPAL CORPORATION


जा.क्र.: मनपा / पे ॲण्ड पार्क / ८७/२०१६-१७ दिनांक : २७/२/२०१७

आहेत्या परिस्थतीच्या अनूषंगाने संबंधित मंजूर निविदाधारकांनी वाहनतळ चालविणे बंधनकारक असते. त्यामुळे आपला खुलासा समाधानकारक नसल्याने अमान्य करण्यात येत आहे.

// आदेश //

ज्याअर्थी मे. सुशिला ट्रेडिंग कॉर्पोरेशन यांनी भाईंदर(प.) रेल्वे स्टेशन जवळ स्कायवॉक खाली पे ॲन्ड पार्क (वाहनतळ) ची निविदा स्विकारलेनंतर काम करणेस असमर्थता दर्शविली आहे.

त्याअर्थी मे. सुशिला ट्रेडिंग कॉर्पोरेशन निविदेतील अटी-शर्तींचा भंग केल्यामुळे त्यांना काळ्या यादीत टाकण्यात येत आहे. यापुढे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कोणत्याही निविदा प्रक्रीयेमध्ये भाग घेण्यास मे. सुशिला ट्रेडिंग कॉर्पोरेशन यांना मज्जाव करण्यात येत आहे. तसेच मे. सुशिला ट्रेडिंग कॉर्पोरेशन युजर आयडी ब्लॉक करण्यात येत आहे.

मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने

(दिपक पुजारी)
उप-आयुक्त (पे ॲन्ड पार्क)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,

१) मे. सुशिला ट्रेडिंग कॉर्पोरेशन,
बी/१०१, ज्युपिटर अपार्टमेंट,
पुनम सागर कॉम्पलेक्स,
मिरा रोड (पु.).

Received
28/02/17

प्रत- माहितीस्तव व पुढिल कार्यवाही करीता

१) सर्व विभागप्रमुख,
२/- मे. सुशिला ट्रेडिंग कॉर्पोरेशन यांचे मालक एस. बी. शुक्ला यांना कोणतेही काम देण्यात येऊ नये.

२) मा. उप-आयुक्त, महानगापालिका (सर्व)
२/- मे. सुशिला ट्रेडिंग कॉर्पोरेशन यांचे मालक एस. बी. शुक्ला यांनी कामात असर्मथता दर्शविल्यामुळे त्यांना कोणत्याही ठेक्याचे काम देण्यात येऊ नये.